## महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

लॉटरी संचालनालय
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

किंमत रू. ५/-

# महाराष्ट्र राज्य लॉटरीची सनद

## १. प्रस्तावनाः

राज्यातील जनतेमध्ये असलेली जुगार, मटका इत्यादी या सवयीपासून परावृत्त करण्यासाठी शासनाने राज्यात दिनांक १२ एप्रिल,१९६९ पासून लॉटरीची सुरूवात केली आहे. महाराष्ट्र राज्य संचलीत लॉटरी व्यवसायाचे नियमन करण्याच्या उद्देशाने शासनाने वित्त विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालयाची स्थापना केली व त्याचेमार्फत महाराष्ट्र राज्य लॉटरी बाबतची सर्व कार्ये करण्यात येतात. राज्य लॉटरीचे दैनंदिन कामकाज प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे नियंत्रणाखाली आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी यांचेकडून हाताळण्यात येते.

लॉटरी पासून शासनास महसूल प्राप्त होऊन राज्याच्या विकासासाठी या महसूलाचा उपयोग करण्यात येतो. लॉटरी योजना चालू झाल्यामुळे शासनास खालील फायदे होतात :-

## २. लॉटरीपासून फायदे:-

१. अवैध लॉटरीवर आळा बसण्यास मदत होत आहे.

२. **महसूल प्राप्ती** - राज्याला लॉटरीपासून काही महसूल प्राप्ती होते आणि वापर राज्याच्या विविध विकास कामासाठी करण्यात येतो.

३. **रोजगार निर्मिती** - या माध्यमातून राज्यातील जनतेस रोजगार उपलब्ध होत असून राज्यात सुमारे १३०० किरकोळ एजंट आहेत. या व्यवसायाशी संलग्न असलेल्या सेवेच्या माध्यमातून सुमारे ५ ते १० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे.

४. **इतर राज्यांतील लॉट-यांवर नियंत्रण ठेवणे** - महाराष्ट्र राज्यात इतर राज्यांच्या लॉट-यासुध्दा चालविल्या जातात. पारंपारिक व नवीन पारंपारिक लॉटरी राज्यात चालविण्यात येत असल्यामुळे इतर राज्यातील लॉट-यांवर नियंत्रण ठेवण्यात येते. शासनाची लॉटरी विश्वासार्ह असल्याने इतर राज्यांच्या लॉटरीवर काही प्रमाणात नियंत्रण आणता येते.

रोला/वाप-२६४९[५००-०२-१२]-१

३. **केंद्रशासनाचे / राज्य शासनाचे महत्त्वाचे अधिनियम :-**

३.१ केंद्र शासनाचा लॉटरी (विनियमन) अधिनियम १९९८ दिनांक ०७ जुलै,१९९८ हे संसदेने पारित केलेल अधिनियम असून ते संपूर्ण भारतासाठी लागू आहेत.

३.२ या अधिनियमातील नियम १२ अनुसार प्रत्येक राज्याला त्यांची स्वत:ची लॉटरी चालविण्यासाठी या अधिनियमातील तरतूदी लागू करण्यासाठी स्वत:चे नियम बनविण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

३.३ प्रस्तुत तरतुदींनुसार महाराष्ट्र शासनाने स्वत:चे महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम २००० भाग -१, दिनांक १८ऑक्टोबर,२००० च्या अधिसुचने अन्वये केलेले आहेत.

३.४ सदर नियमावलीतील नियम क्रमांक ३(१) मधील तरतुदींनुसार वरीलप्रमाणे महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. नियम ३ (२) (३) (४) (५) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरी संदर्भातील सर्व महत्वाचे धोरणात्मक निर्णय व इतर महत्वाच्या बाबींना मा. मंत्री (वित्त) यांची विभागाचे प्रभारी मंत्री तसेच अध्यक्ष लॉटरी मंडळ म्हणून मान्यता घेण्यात येते.

३.५ महाराष्ट्र राज्य लॉटरी योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळ स्थापन केले असून त्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. वित्त मंत्री | अध्यक्ष |
| २) | मा. वित्त राज्यमंत्री | उपाध्यक्ष |
| ३) | प्रधान सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४) | प्रधान सचिव, वित्त विभाग (लॉटरी विषय हाताळणारे) | सदस्य |
| ५) | प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा) गृह विभाग. | सदस्य |
| ६) | सचिव (व्यय),वित्त विभाग. | सदस्य |
| ७) | अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) | सदस्य |
| ८) | संचालक, लेखा व कोषागारे. महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ९) | संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामुग्री व प्रकाशने | सदस्य |
| १०) | आयुक्त, महाराष्ट्र राज्य लॉटरी. | सदस्य सचिव |

लॉटरी (विनियमन) अधिनियमांतर्गत केंद्र शासनाने तयार केलेले लॉटरी (विनियमन) नियम २०१०, दिनांक ०१/०४/२०१० पासून देशभरात लागू केले आहेत.

## ४. आमची वचन बध्दता :-

केंद्र शासनाच्या लॉटरी (विनियमन ) अधिनियम १९९८ मधील कलम ४ मधील तरतुदीनुसार खालील बाबींच्या अधीन राहून राज्य लॉटरी योजना राबविणे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

४.१ राज्य लॉटरीची तिकीट छपाई करतांना लॉटरी तिकीटांवर महाराष्ट्र राज्य लॉटरीचा **"सोंडेत माळ घेतलेला हत्ती "** हे बोध चिन्ह असलेले लॉटरी तिकीटच छापण्यात येईल , जेणेकरून जनतेला महाराष्ट्र राज्याच्या लॉटरी तिकीटांबाबतची विश्वसनीयता वाटू शकेल.

४.२ पारंपारिक तसेच नव्याने सुरू करण्यात येणा-या सुयोग्य राज्य लॉटरीची तिकीटे अधिकृत अभिकर्त्यामार्फत,अधिकृत ठोक अभिकर्त्यांमार्फत (बल्क एजंटामार्फत) किरकोळ अभिकर्त्यामार्फत विकण्यात येतील.

४.३ राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रीपासून प्राप्त झालेले उत्पन्न शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात येईल.

४.४ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडती या स्वत: राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात येतील. मागणी न केलेल्या बक्षिसपात्र तिकीटांची रक्कम शासन लेख्यामध्ये जमा करण्यात येईल.

४.५ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडतींचे ठिकाण राज्यांतर्गत असेल.

४.६ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या सोडतीचे आयोजन राज्य शासनाने निश्चित केलेल्या विहित वेळेत करण्यात येईल.

## ५. आमची कार्यपध्दती :-

५.१ महाराष्ट्र राज्य लॉटरी अधिकाधिक आकर्षक व लोकाभिमूख होण्यासाठी त्या लॉटरीच्या सोडतीची बक्षिसरचना अधिकाधिक आकर्षक व लोकाभिमूख करण्यासाठीच्या उपाययोजना करणे.

५.२ महाराष्ट्र राज्य लॉटरीची तिकीट विक्री सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकृत अभिकर्त्यांची नियुक्ती करणे.

५.३ महाराष्ट्र राज्य लॉटरी योजनेचा प्रचार व प्रसार करणे.

५.४ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या योजनांच्या सोडतीचे विहित कालावधीत व वेळेत आयोजन करणे.

५.५ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व सोडतींची लॉटरी तिकीटे किमान १ महिन्याआधी तिकीटे विक्रीसाठी उपलब्ध करून दिली जातील.

५.६ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या सर्व प्रकारच्या सोडतींचे निकाल त्याच दिवशी राज्यातील माहिती व जनसंपर्क कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठविणे तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे, शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे .

## ६. बक्षिसाची रक्कम प्राप्त करण्याची कार्यपध्दती:-

६.१ तिकीट धारकाने बक्षिसपात्र तिकीट उपसंचालक (वि.व ले.), शिवडी कार्यालयास निकालाच्या प्रसिध्दीपासून किमान ९० दिवसांत सादर करावी.

६.२ तिकीट प्राप्त झाल्यानंतर शिवडी कार्यालयाने बारकोडींगची तपासणी करून तिकीटामध्ये काही दोष नसल्यास त्यावर कार्यवाही करून ८ दिवसांत बक्षिसाची रक्कम अदा करणे.

६.३ शिवडी कार्यालयातील बारकोडींग मशीनमध्ये तिकिटामध्ये काही दोष आढळून आल्यास सदर तिकीटे प्रिंटिंग प्रेसकडे पाठवून त्यावर कारवाई करणे (२१ दिवस).

६.४ प्रिंटींग प्रेसकडून प्राप्त झालेले तिकीट प्रस्तावासह आयुक्त यांना सादर करणे (८ दिवस).

६.५ आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी यांनी प्रस्तावावर निर्णय घेणे (८ दिवस).

**लॉटरी संचालनालयामार्फत पुढील सेवा पुरविल्या जातात :-**

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरीष्ठ अधिका-याचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **रूपये १०,०००/- पर्यंत** बक्षिसपात्र लॉटरी तिकीटांची रक्कम | **लॉटरी अभिकर्त्या -मार्फत** | **०३** दिवस | **आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी**, नवीन प्रशासन भवन, ८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२. दूरध्वनी क्र : ०२२/२२०४८०२९ |
| २ | **रूपये १०,०००/- वरील व रूपये १,००,०००/- पर्यंत** बक्षिसपात्र लॉटरी तिकीटांची रक्कम | **उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी, शिवडी कार्यालय**, शिवडी, मुंबई १५ दूरध्वनी क्र.: ०२२/२३७९१३९२/ २३७७२८११ | परिच्छेद-६ मध्ये दर्शविल्या-प्रमाणे | **आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी**, नवीन प्रशासन भवन, ८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२. दूरध्वनी क्र : ०२२/२२०४८०२९ |
| ३ | **रूपये १,००,०००/- वरील व रूपये ५,००,०००/- पर्यंत** बक्षिसपात्र लॉटरी तिकीटांची रक्कम | **उपसंचालक, महाराष्ट्र राज्य लॉटरी**, नवीन प्रशासन भवन, ८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२ दूरध्वनी क्र : ०२२/२२०४८०२९ | परिच्छेद-६ मध्ये दर्शविल्या-प्रमाणे | **आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी**, नवीन प्रशासन भवन, ८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२. दूरध्वनी क्र : ०२२/२२०४८०२९ |
| ४ | **रूपये ५,००,०००/- वरील सर्व** बक्षिसपात्र लॉटरी तिकीटांची रक्कम | **आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी**, नवीन प्रशासन भवन, ८वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२. दूरध्वनी क्र : ०२२/२२०४८०२९ | परिच्छेद-६ मध्ये दर्शविल्या-प्रमाणे | **प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा)**, वित्त विभाग,३ रा मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दूरध्वनी क्र : ०२२/२३७९१३९२/ २३७७२८११. |

६.६ **संचालनालयाची वेब साईट/संकेतस्थळ सुरू करणे -** लॉटरी संचालनालयाचे संकेत स्थळ (वेब साईट) सुरू करण्यासाठी शासनाने समिती स्थापन करण्यासाठी अद्यावत् web casting संकेत स्थळ सुरू करण्यास लवकरच समितीची बैठक बोलावून संकेतस्थळाचे काम सुरू करण्यात येईल.

**७. <u>लॉटरीच्या योजना :-</u>**

राज्य शासनाकडून सध्या पुढील लॉटरी चालविल्या जातात.

७.१ **पारंपारिक लॉटरीः** या योजनेअंतर्गत खालील साप्ताहिक व भव्यतम सोडती काढण्यात येतात.

(अ) **साप्ताहिक सोडतीः** पारंपारिक लॉटरीच्या रविवारखेरीज साप्ताहिक सहा सोडती (सोमवार- सागरलक्ष्मी, मंगळवार-पद्मिनी, बुधवार-अक्षय, गुरूवार -आकर्षक पुष्कराज, शुक्रवार-

वैभवलक्ष्मी व शनिवार-महाराष्ट्रलक्ष्मी) या प्रमाणे काढण्यात येतात. त्यासाठी आकर्षक बक्षिसरचना करण्यात आली आहे. बक्षिसरचनेत बाजारातील परिस्थितीनुसार वेळोवेळी बदल करण्यात येतो.

(ब) **भव्यतम सोडती :** प्रत्येक वर्षी सहा भव्यतम सोडती ( महाराष्ट्र श्री गणपती, महाराष्ट्र दसरा, महाराष्ट्र दिवाळी, महाराष्ट्र न्यू ईयर-नाताळ, महाराष्ट्र गुढीपाडवा व महाराष्ट्र दिन ) काढण्यात येतात. या भव्यतम सोडतींची बक्षीस योजना प्रत्येक वेळी शासन मान्यतेने नव्याने निश्चित करण्यात येते.

(क) **मिनी लॉटरी :** राज्य शासनाचे महसूली उत्पन्न वाढविण्याकरिता शासनातर्फे सोमवार (महाराष्ट्र डायमंड) व बुधवार (महाराष्ट्र प्लॅटिनम) आणि गुरूवार (महाराष्ट्र गोल्ड मिनी) व शनिवार (महाराष्ट्र सिल्व्हर मिनी), हया प्रत्येक आठवडयात ४ साप्ताहिक मिनी लॉटरीच्या सोडती सुरु करण्यात आली आहे.

### ७.२ नवीन पारंपारिक पेपर लॉटरी:-

आता नवीन पारंपारिक लॉटरीच्या महाराष्ट्र सुरभी व महाराष्ट्र भूषण या २ साप्ताहिक व महाराष्ट्र गौरव १ मासिक सोडती शासनामार्फत नेमण्यात आलेल्या घाऊक अभिकर्त्यांमार्फत चालविल्या जातात. वरील सर्व सोडती महाराष्ट्र राज्य लॉटरी, शिवडी येथील कार्यालयात काढण्यात येतात.

## ८. घाऊक / किरकोळ अभिकर्ते यांची नियुक्ती :-

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीटांची विक्री संपूर्ण राज्यभर करण्यासाठी घाऊक व किरकोळ अभिकर्ते यांच्या नियुक्तीबाबतचे निकष व कार्यपध्दती तयार करण्यात आले असून घाऊक व किरकोळ अभिकर्त्यांच्या नियुक्तीसाठी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली आहे. या जाहिरातीस चांगला प्रतिसाद प्राप्त झाला असून नियुक्तीसाठी राज्यभरात प्रचंड प्रतिसाद मिळाला असून अर्ज वितरीत करण्याची कार्यवाही चालू आहे. संबंधीतांकडून नियुक्ती मिळण्याबाबतचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर घाऊक व किरकोळ अभिकर्ते नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीटांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना अनुज्ञाप्ती / परवानापत्र देण्याबाबतची कार्यवाही लवकरच करण्यात येईल.

## ९. लॉटऱ्यांवरील कर :-

मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ मध्ये सुधारणा करून दिनांक २९ जून, २००४ पासून लॉटरी वरील विक्रीकर वसुलीचे अधिकार लॉटरी विभागास हस्तांतरित करण्यात आले आहेत. सदर कर हा विक्री कराचाच एक भाग असल्याने विक्री कर विभागाच्या उपशिर्षाखाली जमा केला जात होता. महाराष्ट्रात ०१ एप्रिल,२००५ पासून मुल्यवर्धीत कर प्रणाली अर्थात व्हॅट लागू केल्याने व त्यातून लॉटरी वगळण्यात आल्याने लॉटरीपासून शासनास कराचे काहीच उत्पन्न मिळत नव्हते. राज्याच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या उद्देशाने लॉटरी योजनांवर कर आकारणी करण्यास व राज्यातील सर्व लॉटरी संगणक टर्मिनल्सवर विहित दराने अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यास मंत्री मंडळाची मान्यता घेण्यात आली.

त्यास अनुसरून महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २९ डिसेंबर,२००६ अन्वये महाराष्ट्र राज्य लॉटरी व इतर राज्यांच्या महाराष्ट्रात चालविण्यात येणा-या लॉटरी योजनांवर कर आकारणी

करण्यासाठी महाराष्ट्र लॉट-यांवरील कर अधिनियम, २००६(सन २००६चा अधिनियम क्रमांक ४३) प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार लॉटरीवरील कराचे सध्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| लॉटरी योजना | आकारण्यात येणारा दर |
|---|---|
| साप्ताहिक योजना | रू.५०,०००/-प्रति योजना |
| पाक्षिक योजना | रू.१,००,०००/-प्रति योजना |
| मासिक योजना | रू.२,००,०००/-प्रति योजना |
| भव्यतम योजना | रू.१०,००,०००/-प्रति योजना |

कर भरणा-या लॉट-या अधिकृत समजल्या जातील.

**१०. अवैध लॉट-यांवरील कार्यवाही:-**

महाराष्ट्र लॉट-यांवरील कर अधिनियम,२००६ अनुसार लॉटरी कर भरणाऱ्या लॉटरी योजनांची माहिती लॉटरी विक्रेत्यांना, जनतेला व्हावी याकरिता ज्या योजनांवर लॉटरी कर भरण्यात आला आहे अशा अधिकृत लॉटरी योजनांची यादी शासन स्तरावर दि.२३.१२.२०१० पासून प्रत्येक आठवडयाच्या दर शुक्रवारी परिपत्रकाव्दारे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नियमितपणे प्रसिध्द करण्यात येते.

या यादीव्यतिरिक्त अन्य लॉटरी योजना राज्यात चालविण्यात येत असल्यास अशा योजना अनधिकृत असून या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी यासाठी सदर परिपत्रकाच्या प्रती गृह विभाग,पोलीस महासंचालक, विभागीय पोलीस आयुक्त, सर्व जिल्हा पोलीस प्रमुख व सर्व जिल्हाधिकारी यांना पाठविल्या जातात. तसेच अनधिकृत लॉटरी संबधात प्राप्त होणा-या तक्रारी कार्यवाहीसाठी गृह विभागास पाठविण्यात येतात.

**११. संचालनालयातील / आयुक्तालयातील कामकाजाचे वाटप.**

**रोख शाखा:-**

- लेखा अर्थसंकल्प ताळमेळ महालेखापाल कार्यालयातील संबंधित सर्व कामकाज.
- लेखा परीक्षा परिच्छेद व विनियोजन लेखे विषयक कामे हाताळणे.
- आहरण व संवितरण अधिकारी असल्यामुळे रोख रकमांवर नियंत्रण ठेवणे .
- खर्चाच्या नोंदवहया अद्यावत ठेऊन मंजूर करण्यात आलेल्या अनुदानावर व खर्चावर नियंत्रण ठेवणे.
- रोकडवही व रोख रकमा यांची तपासणी करणे.
- रोख शाखेचे सर्व कामे हाताळणे.
- उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने विधान मंडळ, न्यायालयीन प्रकरणे, माहितीचा अधिकार, महालेखापाल, लोकायुक्त इत्यादी कार्यालयाशी संबंधित कामकाज.

**लॉटरी - ३ :-**

- महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय व शिवडी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या आस्थापनाविषयक सर्व बाबी.
- कार्यालयीन सामुग्री पुरवठा व देखभाल,
- शिवडी कार्यालयाची इमारत भाडेतत्वावरील कराराचे कामकाज.
- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विधान मंडळ, न्यायालयीन प्रकरणे, माहितीचा अधिकार, महालेखापाल, लोकायुक्त इत्यादी कार्यालयांशी संबंधीत कामकाज.

**लॉटरी - २ :-**

- राज्य लॉटरी सोडती व लॉटरी कर संबंधीत सर्व कामकाज .
- राज्य लॉटरी सोडतीचे शासन निर्णय व प्रसिध्दी,छपाईचे आदेश,डिझाईन्स.
- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विधान मंडळ, न्यायालयीन प्रकरणे, माहितीचा अधिकार, महालेखापाल, लोकायुक्त इत्यादी कार्यालयांशी संबंधीत कामकाज.

तसेच केंद्रीय माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय व उपसंचालक (वि. व ले.) शिवडी यांच्या कार्यालयातील सहाय्यक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहे.

**महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयाची माहिती.**

| अ क्र | पदनाम | माहितीच्या कायदयानुसार हुद्दा | कार्यालयातील दूरध्वनी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | उपसंचालक, राज्य लॉटरी | अपिलीय अधिकारी | ०२२-२२८७६१३८ | संपूर्ण महाराष्ट्र |
| २ | राज्य लॉटरी अधिकारी,लॉ-३ | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२७४५३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ३ | राज्य लॉटरी अधिकारी, लॉ-२ | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२७४५३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ४ | लेखा अधिकारी (रोख शाखा) | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२७४५३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ५ | सहाय्यक, लॉटरी-३ | सहायक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२७४५३ | संपूर्ण महाराष्ट्र |
| ६ | सहाय्यक, लॉटरी-२ | सहायक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२०२७४५३ | संपूर्ण महाराष्ट्र |

**उपसंचालक (वित्त व लेखा), म.रा.लॉ.शिवडी यांचे कार्यालयातील अपिलीय अधिकारी व माहिती अधिकारी याबाबतची माहिती.**

| अ.क्र | पदनाम | माहितीच्या कायदयानुसार हुद्दा | कार्यालयातील दूरध्वनी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | उपसंचालक, (वि. व ले.) शिवडी कार्यालय. | अपिलीय अधिकारी | ०२२-२३७९१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| २ | लेखा अधिकारी (प्रशासन शाखा) | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३७९१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| ३ | लेखा अधिकारी लॉ - २ | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३७९१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी (लेखा शाखा) | सहायक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३७९१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |
| ५ | सहाय्यक लेखा अधिकारी (प्रशासन ) | सहायक शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२३७९१३९२/ ०२२-२३७७२८११ | शिवडी कार्यालय |

-------